REGISTERED No. B. 3434

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

" अर्थ "

" *दुर्गाधिवास* " पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ११ मे, १९४९ | अंक १९

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तु, इत्यादींसाठी चौकशी करा:—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज
( ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
( ले :–. रेवि ॲले, किं. २ रु. )

( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स
( ले.:– एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )

दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी ( २ ) शाहुपुरी–कोल्हापूर ( ३ ) मलकापूर ( ४ ) पेठ वडगांव ( ५ ) जयसिंगपूर ( ६ ) इचलकरंजी ( ७ ) गडहिंग्लज ( ८ ) निपाणी (जि. बेळगांव) ( ९ ) मुंबई–फोर्ट–( १० ) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें






## सर्व प्रसिद्ध माल

ओगले यांचीं टंब्लर्स, पेले, लेमन स्कीझर्स, पेट्रोमॅक्स ग्लोब्स, तांब्या भांडीं, चिमण्या, बाटल्या व शास्त्रीय उपकरणें इत्यादि कांच माल.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.


## विविध माहिती

**परराष्ट्रीय भाषांचें शिक्षण**—हिंद सरकारच्या संरक्षण खात्यातर्फे परकीय भाषांचें शिक्षण देण्यासाठी एक शाळा दिल्ली येथें उघडण्यांत आली आहे. ह्या शाळेंत सध्या २०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेंत फ्रेंच, चिनी, अरेबिअन, रशिअन आणि जर्मन भाषा शिकविण्याची सोय करण्यांत आली आहे.

**मुंबईतील बँक तात्पुरती बंद**—एक्स्चेंज बँक ऑफ इंडिआ अँड आफ्रिका लि., ह्या बँकेनें आपले व्यवहार पैशाच्या अभावामुळें तात्पुरते स्थगित केले आहेत. ह्या बँकेचे व्यवहार अडचणींचे होत चालल्याचें नजरेस येत चाललें होतेंच. तथापि, बँकेवरील ह्या प्रसंगामुळें इतर बँकांवर कांहीं परिणाम होण्याची शक्यता नाहीं. बँकेनें रिझर्व्ह बँकेकडे हंगामी कर्ज देण्याची विनंति केली होती. परंतु ती मान्य न झाल्यानें आतां बँकेनें १९३९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टच्या ३७ व्या कलमान्वयें, बँकेविरुद्ध चालू असलेले अगर नवीन होणारे कायदेशीर इलाज थांबविण्यांत यावेत अशा हुकुमासाठीं अर्ज केला आहे. ही बँक १९४३ मध्यें स्थापन झाली असून तिचें अधिकृत भांडवल १२० लाख रुपये; विक्रीला काढलेलें भांडवल ६० लाख रुपये; खपलेलें भांडवल ५९,९९,९०० रुपये आणि वसूल भांडवल २९,९९,९५० रुपये आहे. बँकेची मुख्य कचेरी मुंबईला असून हिंदुस्थानांत व परदेशांत तिच्या अनेक शाखा आहेत.

**हिंदुस्थान सरकार कर्ज परत करणार**—हिंदुस्थान सरकारनें १९४९-५२ ह्या मुदतीचें ३ टक्के व्याजाच्या दराचें रुपयांतील कर्ज, १ ऑगस्ट १९४९ रोजीं १०० रुपयाला १०० रुपयेप्रमाणें व्याजासकट परत करण्याचें ठरविलें आहे. सरकारच्या फडणिशी खात्यातर्फे तसें पत्रक काढण्यांत आलें असून १ ऑगस्ट १९४९ नंतर कर्जावर व्याज चालू रहाणार नाहीं.

**अमेरिकेचें मुंबईतील वाचनालय**—अमेरिकन सरकारनें मुंबईत चालविलेलें वाचनालय ह्यापुढें शनिवारींहि इतर दिवसांप्रमाणें सकाळीं १० पासून संध्याकाळीं ७ पर्यंत खुलें रहाणार आहे. ह्या वाचनालयांत ४,४०० पुस्तकें असून त्याशिवाय २०० अमेरिकन नियतकालिकेंही येत असतात.

**अधिक काम देणारा नवा नांगर**—दिल्लीमधील इंडिअन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटनें एक नव्या प्रकारचा नांगर तयार केला आहे. ह्या नांगराला बैलांची एकच जोडी लागेल पण तो काम मात्र दुप्पट येईल. नांगराला दोन पातीं असून तीं एकाच दांड्यानें ओढलीं जातात. नांगराची किंमत सध्या प्रचलित असलेल्या नांगरापेक्षां अगदी थोडी अधिक असून तो खेड्यांतील लोहारांनाहि करतां येण्यासारखा आहे.

**बिहारमधील नोकरी देणाऱ्या संस्था**—बिहारमधील नोकरी देणाऱ्या संस्थांच्या संख्येंत वाढ करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें एक योजना संमत केली आहे. ह्या योजनेप्रमाणें, प्रांतांतील ११ जिल्ह्यांतून अशा प्रकारच्या संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. बिहार प्रांताचें क्षेत्रफळ ६९,७४५ चौरस मैल असून लोकसंख्या ३ कोटी ६० लक्ष आहे. एवढ्या विस्तीर्ण प्रांतासाठीं आतांपर्यंत नोकरी पुरविणाऱ्या फक्त ४ संस्था होत्या.

**विक्रीवरील कर मध्यवर्ती सरकारनें बसवावा**—मध्यप्रांतांतील तीन व्यापारी संघांनीं, विक्रीवरील कर मध्यवर्ती सरकारनें बसवावा म्हणजे त्या कराबाबत सर्व प्रांतांत एकसूत्रता येईल असें आपलें मत व्यक्त केलें आहे. मध्यप्रांतांत विक्रीकरास पात्र असणाऱ्या वस्तूंच्या यादींत जी भर टाकण्यांत आली त्याचा विचार करण्यासाठीं हे संघ मुद्दाम एकत्र जमले होते. संघांनीं आपल्या सूचना फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेमार्फत हिंदुस्थान सरकारला कळविल्या आहेत.

**सुपारीवाल्यांची परिषद**—कारवार जिल्ह्यामधील शिरसी येथें सुपारीच्या बागाइतदारांची एक परिषद ता. ७ मे रोजीं भरविण्यांत येणार होती. मद्रास प्रांताचे माजी मंत्री श्री. काशिनाथ परिषदेचे अध्यक्ष असून हिंद सरकारचे माहिती खात्याचे मंत्री श्री. आर. आर. दिवाकर हे परिषदेचे उद्घाटक होते.

**हिंदुस्थानांत नव्या कापडाच्या गिरण्या**—चालू वर्षअखेर हिंदुस्थानांत १५ नवीन कापडाच्या गिरण्या निघणार आहेत. ह्या गिरण्यांमधून ८ ते १० कोटी वार कापड निर्माण होऊं शकेल. १९५१ अखेर, हिंदुस्थानांत हल्लीं उत्पादन होतें त्यापेक्षा ४० कोटी वार कापड अधिक निघूं लागेल आणि त्यामुळें देशांतील गरजा भागवून परदेशीं बाजारपेठांतूनहि माल पाठवितां येईल. कापड गिरण्यांना लागणारीं यंत्रें तयार करण्याचे ६ कारखाने निघणार आहेत. त्या सर्वांचें मिळून भांडवल ६ कोटी रुपये आहे. मुंबई, ग्वाल्हेर, कानपूर आणि कोइमतूर ह्या ठिकाणीं ह्या कारखान्यांच्या जागा मुक्रर झाल्या आहेत.

**धान्यवसुलीच्या किंमती कमी होणार?**—खरीपाच्या पिकाच्या येत्या हंगामापासून सरकारी धान्यवसुलीच्या किंमती कमी होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांतील एकूण वार्षिक धान्याचें उत्पादन सुमारें ४·२ कोटी टन आहे. त्यांतील २·६ कोटी अन्नधान्य खरीपाच्या हंगामांत निघतें. धान्यवसुलीच्या किंमती कमी करण्यांत आल्या तर त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किंमती उतरण्यांत होईल असा अंदाज आहे.

**रेल्वे वॅगन्सचा उपयोग किती झाला?**—हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रुंद रुळाच्या रेल्वेवर, दररोज सरासरी ११,५२८ मालाचे डबे, मार्च २० ला पुऱ्या झालेल्या महिन्यांत भरले जात असत. त्यापूर्वीच्या महिन्यांत दररोज सरासरी ११,४१९ डबे भरले गेले, अशी आंकडेवारी प्रसिद्ध झाली आहे.

**जागतिक बँकेचें हिंदला कर्ज**—हिंदुस्थाननें आपल्या आर्थिक विकासासाठीं जागतिक बँकेला सादर केलेल्या योजनांसाठीं ५०,००,००,००० डॉलर्स खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या योजनांत रेल्वेचे रस्ते, वीज निर्मितीचीं केंद्रें, पाटबंधारे आणि पडीक जमीन लागवडीस आणण्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री, इत्यादि कार्यक्रमाचा समावेश होतो. रेल्वेच्या वाढीसाठीं लागणाऱ्या खर्चापैकीं सुमारें ६० टक्के खर्च डॉलर सारख्या दुर्लभ चलनांत करावा लागेल. सर्व योजनांपैकीं ५० टक्के खर्च डॉलरच्या रूपानें करावा लागेल.

# अर्थ

बुधवार, ता. ११ मे १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## अलिकडच्या आर्थिक परिस्थितीचें विश्लेषण

अगदी अलिकडे हिंदच्या आर्थिक जीवनांत पुढील चार गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. निरनिराळ्या करांचें वाढतें व सर्वांनाच दुःसह होणारें दडपण, नवीन भांडवलाच्या गुंतवणुकीबद्दल निरुत्साह, औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींत मंदपणा, व सर्वांत मुख्य म्हणजे नाणेंबाजारांत तीव्रतेनें जाणवणारी पैशाची चणचण ह्या त्या चार गोष्टी होत. एप्रिलअखेरच्या आठवड्यांत अर्थमंत्री डॉ. मथाई यांनीं मुंबईला भेट दिली त्यावेळीं निरनिराळ्या प्रातिनिधिक व्यापारी संघटनांकडून आपल्या मुख्य अडचणींचें निवेदन त्यांच्या समोर करण्यांत आलें. डॉ. मथाई यांनीं केलेल्या वक्तव्यांत सध्यांची परिस्थिति कायम टिकणारी नसून प्रासंगिक, तात्पुरती आहे व परिस्थिति लौकरच आटोक्यांत येईल असा विश्वास व्यक्त केला. कापड–नियंत्रण व कापसाची किंमत याबाबतींतहि गंभीर परिस्थिति निर्माण झाली आहे, व उद्योगमंत्री डॉ. मुकर्जी यांनीं मुंबईला केलेल्या टेक्स्टाईल सोशल क्लबपुढील भाषणांत कापड नियंत्रण सध्यां चालूं राहील असें सांगितलें. गिरणी–मालक वर्गामध्यें कापड–नियंत्रण धोरणाबद्दल असंतोष पसरला आहेच. हिंद सरकारनें गेल्या वर्षीं एप्रिलमध्यें औद्योगिक धोरण जाहीर केल्यानंतर भांडवलदार वर्गाचा गैरसमज पुष्कळ अंशीं दूर झाला व नंतरच्या एका वर्षाच्या कालावधींत सरकारी मंत्र्यांनीं केलेलीं वक्तव्यें भांडवलदार वर्गाचा विश्वास वाढविण्यास कारण झालीं. हें सर्व खरें असलें व जरी १९४८ चें औद्योगिक उत्पादन १९३९ च्या मानानें स्थूलमानानें १५ टक्के ह्या प्रमाणांत वाढलें असलें, तरी ही वाढ आजची गरज लक्षांत घेतां व ऐन युद्ध–काळांतील म्हणजे १९४३–४४ च्या उत्पादनाच्या मानानें बरीच कमी आहे. कारण १९४३–४४ चें उत्पादन १९३९ च्या मानानें २६ टक्के जास्त होतें. आज हिंदच्या प्रश्नांचा जागतिक पार्श्वभूमीच्या दृष्टीनें विचार करावा लागतो. ब्रिटन, कॅनडा, अमेरिका व जपान आणि जर्मनी यांचेंहि उत्पादन वाढत्या प्रमाणांत आहे व ह्या वाढत्या उत्पादनाच्या पाठबळावरच विशेषतः ब्रिटन व जपान यांची परिस्थिति सुधारत आहे. औद्योगिक धोरण गेल्या एक वर्षांत बरेंचसें स्पष्ट करण्यांत आलें, व ६ एप्रिल रोजीं परराष्ट्रीय भांडवलाबद्दलहि स्पष्ट व योग्य घोषणा आपल्या मुख्य प्रधानांनीं केली हें सर्व खरें असलें तरी उत्पादनाचीं सूत्रें ज्यांच्या हातीं आहेत तो कारखानदारवर्ग परिस्थितीबद्दल बराच चिंतातुर झालेला दिसतो हें गेल्या एका महिन्यांतील वक्तव्यांवरून दिसून येतें.

पंजाब नॅशनल बँकेचे अध्यक्ष लाला योधराज यांनीं बँकेच्या वार्षिक सभेच्या वेळीं दिल्ली येथें केलेल्या भाषणांत व्याजाचा दर गेलीं कांहीं वर्षें अतिशय कमी आहे, व तो वाढविल्याशिवाय बँकांकडे ठेवींच्या रूपानें पैसा आकृष्ट होणार नाहीं असें प्रामुख्यानें प्रतिपादलें आहे. स्वस्त पैशाचें धोरण त्वरित बदलल्याशिवाय आर्थिक परिस्थिति सुधारणार नाहीं, असें त्यांचें निश्चित मत आहे. आपल्या म्हणण्याच्या पुष्टीसाठीं फ्रान्स, ब्रिटन इ. देशांतील कांहीं उदाहरणें त्यांनीं दिलीं. व्याजाचा दर वाढला म्हणजे पैसे कर्जाऊ घेणारांची प्रवृत्ति पूर्ववत कायम राहीलच असें नक्की सांगतां येत नाहीं व कांहीं उद्योगधंद्यावर कदाचित् विघातक परिणाम होईल. हल्लीं समाजांतील कामगार व शेतकरी वर्गाच्या हातांत जास्त पैसा खेळत असल्यामुळें वाढत्या व्याजाच्या दरानें तो बँकांकडे आकृष्ट होईल असें लाला योधराज यांचें मत आहे.

शेठ रामकृष्ण डालमिया यांनीं एक पत्रक काढून असें प्रतिपादन केलें आहे कीं, एकंदर चलनाच्या मानानें बँकांतील ठेवी हल्लीं घटत चालल्या आहेत. महायुद्धापूर्वी बँकांतील ठेवी चलनाच्या मानानें १२५ टक्के होत्या, परंतु युद्ध संपल्यानंतर हें प्रमाण ८५ वर आलें व अगदी अलिकडे तर तें ७८ पर्यंत खालीं आलें आहे. इतर देशामध्यें बँकांतील ठेवी निदान स्थिर तरी आहेत, परंतु हिंदमध्यें मात्र त्या घटत आहेत. जून १९४८ पासून एप्रिल १९४९ पर्यंत ठेवीमध्यें ९६ कोटी रुपयांची घट दिसून येते. ठेवींची रक्कम दरमहा १५ कोटी रुपये या प्रमाणांत घटत आहे व दुसऱ्या बाजूला कर्ज देण्याचें प्रमाण दरमहा १३ कोटी, २० लक्ष रुपये या प्रमाणांत वाढत आहे. याचा परिणाम भांडवल गुंतवणुकीवर अनिष्ट झाला आहे, व पैशाची तीव्र टंचाई भासत आहे.

वरील दोन मतांवरून असें दिसतें कीं पैशाच्या बाबतींत चणचण निर्माण झाली आहे व ही चणचण दूर झाल्याशिवाय उत्पादनाला जास्त चालना मिळणार नाहीं. उद्योगधंद्यासाठीं बँकांकडे पैशाची मागणी जास्त प्रमाणांत केली जात आहे ती वाढत्या औद्योगिक उत्पादनासाठीं नसून कच्च्या व पक्क्या मालाच्या फुगत जाणाऱ्या किंमतीप्रीत्यर्थ व कांहींसा कच्चा व पक्का माल सांठवून ठेवावा लागत असल्यामुळें केली जात आहे असें कांहींचें म्हणणें आहे. अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत पैशाच्या चणचणीचीं तीन कारणें सांगितलीं. तीं अशीं:— कर–वसुलीची मोहीम, धान्य व इतर आयातींवर होणारा भरमसाट खर्च, कच्चा माल आणि साठा या बाबतींत वाढत्या किंमतीमुळें कारखानदारांचा गुंतून राहिलेला पैसा. तेव्हां धान्य व इतर कच्च्या मालाचे बाजारभाव उतरूं लागले म्हणजे सध्यांची पैशाची टंचाई दूर होऊं शकेल असें दिसतें.

गेल्या दोन वर्षांत शेतकरीवर्गाच्या हातांत जास्त पैसा खेळत आहे. याला पोषक विधान संयुक्त प्रांताचे पुरवठा मंत्री श्री. गुप्ता यांनीं नुकतेंच केलें. १९३९ च्या किंमतीशीं मूळ किंमत १०० धरून तुलना करतांना गव्हाचीं किंमत सध्यां ७७३ झाली आहे, कापडाची ४७१, रॉकेलची १६९, मिठाची २००, दूध व तूप यांची ५००, लोखंड व पोलाद यांची सुमारें ३०० व सिमेंटची २९५ झाली आहे. यावरून गहूं व दूध-दुभते यांच्याशीं संबंध येणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती विशेष सावरली आहे असें अनुमान निघतें. १९३९ सालीं डाळीचा भाव मणाला २। रुपये होता तो आतां १३ रुपये झाला आहे. तेल बियांचा भाव मणाला ४ रुपये होता तो सध्यां ३० रुपये झाला आहे, व उसाचा भाव ५ आणे होता तो आतां १ रुपया १० आणे आहे. शेती मालाच्या

वाढत्या किंमतीमुळें शेतकऱ्यांचें उत्पन्न हल्लीं ५०० टक्क्यांनीं वाढलें आहे असा श्री. गुप्ता यांचा अंदाज आहे. यावरूनहि भांडवलदार म्हणतात त्या विधानालाच पुष्टि मिळते. तीं अशी कीं, गेल्या एक-दोन वर्षांत पैसा कामगार व शेतकरी वर्गांच्या हातांत जास्त प्रमाणांत गेल्यामुळें तो पैसा फारसा शिल्लक टाकला जात नाहीं किंवा उद्योगधंद्यांकडे आकर्षिला जात नाहीं. याचा परिणाम म्हणजे एकंदर देशांतील शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति कमकुवत होत जाऊन उद्योगधंद्यांना भांडवल मिळूं शकत नाहीं. पुणें येथील नॅशनल सेव्हिंग्ज प्रॉजेक्ट्स प्रदर्शनांत भाषण करतांना डॉ. मथाई ह्यांनीं ह्या प्रश्नाचा उल्लेख केलाच होता. शेतकरीवर्गास बचतीची संवय लागण्याचें राष्ट्रीय महत्त्व त्यांनीं त्यावेळीं प्रतिपादन केलें होतें.

### बँक–नोकर संबंध : नवा वटहुकूम

ज्या बँकांच्या आणि विमा कंपन्यांच्या शाखा एकाहून अधिक प्रांतांत असतील त्यांच्या संबंधीं कांहीं औद्योगिक तंटा उपस्थित झाल्यास तो इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल ॲक्ट प्रमाणें निर्माण करण्यांत येणाऱ्या कोर्टाकडे सोपविण्यांत यावा असा वटहुकूम हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. हा वटहुकूम तावडतोब अंमलांत याव-याचा आहे. ह्या हुकुमामुळें प्रांतिक सरकारांना वरील कंपन्यांतील तंट्यांबाबत तडजोड, चौकशी अगर इतर मार्ग पत्करण्याची बंदी करण्यांत आली आहे.

कामगार विषयक कायदे करतांना साधारण अशिक्षितांचा विचारच मुख्यत्वें करून करण्यांत आला असल्याकारणानें, गिरणी कामगार व बँकांचा नोकरवर्ग ह्यांस एकाच मापानें मोजून, एकच कायदा दोघांनाहि लागू करणें वास्तविक चुकीचें आहे. बँकिंग हा विषय मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंत असला, तरी बँकांच्या नोकरांचा प्रश्न प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत आहे.बँकांचा किंवा विमा कंपन्यांचा व्याप गिरणी अथवा कारखाना ह्यांचिप्रमाणें एकाद्या ठिकाणापुरता मर्यादित नसतो. त्यांच्या अनेक प्रांतांतून शाखा असतात. वेगवेगळ्या प्रांतांनीं नोकर विषयक वेगवेगळे कायदे केले, तर ते त्यामुळें बँकांसारख्या संस्थांना जाचक होतात. एका प्रांतांतील शाखांचे नोकर एका कायद्याखालीं तर दुसऱ्या प्रांतांतील शाखांचे नोकर दुसऱ्या कायद्याखालीं, अशी चमत्कारिक परिस्थिति निर्माण होऊन, सर्वांसाठी एकजात नियम करतां येत नाहींत. संयुक्त प्रांतांतील बँकांना तेथील लेबर कमिशनरच्या परवानगी शिवाय आपल्या नोकरांची एका शाखेंतून दुसऱ्या शाखेंत बदलीसुद्धा करता येत नाहीं, इतका तेथील कायदा पुढें गेला आहे, असें समजतें. मुंबई प्रांतांतील इंडस्ट्रिअल कोर्टानें १९४६ सालीं जो निवाडा केला, त्याचे आधारावर आज मुंबईमधील बँकांतील नोकर विषयक संबंध आधारलेले आहेत. हा निवाडा बाजूस सारणाऱ्या नोटीसा कित्येक बँकांच्या नोकरवर्गाच्या संघांनीं आपआपल्या बँकांस दिलेल्या आहेत आणि बँकांकडे नव्या मागण्या केलेल्या आहेत. मुंबई सरकारनें अशीं सुमारें ३० प्रकरणें इंडस्ट्रिअल कोर्टाकडे पाठविलेलीं आहेत. हिंदुस्थान सरकारच्या नव्या ऑर्डिनन्सप्रमाणें, हीं सर्व प्रकरणें आतां स्थगित होतील आणि तीं मध्यवर्ती इंडस्ट्रिअल कोर्टाकडे पाठवावीं लागतील. ज्या बँकांच्या सर्व शाखा मुंबई प्रांतांतच आहेत, अशांचे संबंधांतील प्रकरणें मात्र प्रांतिक ट्रायब्यूनलनेंच निकालांत काढावयाचीं आहेत. इतर बँकांचें-मधील नोकरविषयक तंटे अखिल भारतीय दृष्टिकोनानें आतां सोडविले जातील; प्रांताप्रांतांत फरक रहाणार नाहीं.

## महाराष्ट्र कृतिवंत झाल्याविना दुर्दशा थांबणार नाहीं !

### विधायक कार्याची चटक कशी लागेल ?

( श्री. शं. वा. किर्लोस्कर ह्यांचा एक लेख वरील मथळ्याखाली "अर्थ"च्या ता. २७ एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील विचारसरणी विचारवंतांना पूर्णपणें पसंत पडलेली दिसते. श्री. वा. कृ. कोगेकर, एल. एजी., ह्यांचें संपादकास आलेलें पत्र खाली दिलें आहे. )

श्री. संपादक — ६२५ सदाशिव पेठ, पुणें २
" अर्थ " पुणें. — ४-५-४९

न. वि. वि. अर्थ साप्ताहिकाच्या ता. २७ एप्रिल १९४९ च्या अंकांत " विधायक कार्याची चटक कशी लागेल " या मथळ्या-खालीं आलेल्या लेखामध्यें सध्याच्या सर्वसाधारण परिस्थितीचें यथार्थ चित्रण करून यापुढें कोणते मार्ग स्वीकारले पाहिजेत व काय केलें पाहिजे यासंबंधीं अत्यंत वास्तववादी दिग्दर्शन केलेलें आहे. लेखांतील विचारसरणी प्रत्येकानें मनन करण्यासारखी आहे. लेखांत निदर्शित केल्याप्रमाणें सध्याच्या परिस्थितींत योग्य असें " एक प्रचंड वैचारिक स्थित्यंतर " घडवून आणण्याची जरूरी आहे हेंही सर्वांस पटण्यासारखेंच आहे.

समाजाच्या उन्नतीच्या ध्येयानें प्रेरित होऊन कार्य करणाऱ्या आस्तित्वांत असलेल्या व नवीन निघणाऱ्या संस्था उ. नागरिक संघटना समित्या, सर्वोदय समाज संस्था वगैरेंच्या ध्येयामध्यें लेखांत प्रतिपादन केलेल्या तत्त्वांचाही समावेश होणें अत्यंत इष्ट व जरूरीचें आहे, असें वाटतें. लेख फारच उद्बोधक असून शहरा-पासून तो खेड्यापर्यंत आस्तित्वांत असणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या समाजोपयोगी संस्थांमध्यें त्यांतील विचारसरणीचा फैलाव व प्रत्यक्षांत आचरण होण्याची अत्यंत आवश्यकता आहे, असें वाटतें. क. ही. वि.

वा. कृ. कोगेकर.

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि, सातारा

५ लक्ष रु. वसूल भांडवल, १ लक्ष ३१ हजार रु. रिझर्व्ह व इतर फंड, ७२½ लक्ष रु. ठेवी, इत्यादि बाबी वरील बँकेच्या ताळेबंदांतील भांडवल व देणें ह्या बाजूस आहेत. ९० लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं ६ लक्ष रु. रोकड व बँकांत असून ४१ लक्ष रुपयांचे रोखे आहेत आणि तितकीच रक्कम कर्जाऊ दिलेली आहे. १९४७ च्या मानानें १९४८ सालीं बँके-कडील ठेवींत ८½ लक्ष रुपयांची वाढ दिसून येते आणि ताळे-बंदाची बेरीजहि ११ लाखांनीं अधिक आहे. १९४८ सालीं बँकेस ५२ हजार रु. निव्वळ नफा झाला. त्यापैकीं २० हजार रु. रिझर्व्ह व कॉन्टिन्जन्सी फंडांत टाकण्यांत आले व ३० हजारांचा विनियोग ६% प्रमाणें डिव्हिडंड वांटण्याकडे करण्यांत आला. अहवालाचे वर्षी शेअर्स, डिबेंचर्स, वगैरेंचे भाव घसरले तेव्हां बँकेचा इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड २६,००० रुपयांनीं वाढविण्यांत आला. ही वाढीची रक्कम मुख्यत्त्वें बँकेस मिळालेल्या रिफंड ऑफ इनकमटॅक्स मधूनच करण्यांत आली आहे.

बँकेची मजबुती वाढविण्याकडे चालकांचें विशेष लक्ष असतें. श्री. अण्णासाहेब चिरमुले हे संचालक मंडळाचे अध्यक्ष आहेत हें सांगितल्यावर हें नमूद करण्याची आवश्यकता नाहीं. श्री. सी. ह. जोशी, बी. ए, बी. कॉम. हे मॅनेजर असून श्री. रा. ना. गोडबोले बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. हे सेक्रेटरी आहेत.

## "सहकाराचा बीज-मंत्र"

"युनायटेड लॉज ऑफ थिऑसॉफिस्टस, मुंबई या संस्थेतर्फे निरनिराळ्या विषयांवर विचारपरिप्लुत व अभ्यासपूर्वक लिहिण्यांत आलेलीं अशीं कांहीं पत्रकें वेळोवेळीं छापण्यांत येतात. या संस्थेतर्फे दि. २१-३-१९४९ रोजीं सहकारी चळवळ आणि थिऑसॉफी या विषयावर एक लहानसें पत्रक प्रसिद्ध झालें. सहकारी चळवळीच्या बाबतींत थोडक्यांत परंतु मुद्देसूद असे सुंदर विचार त्या पत्रकांत मांडलेले दिसून आल्यानें त्यांतील आवश्यक त्या मजकुराचा अनुवाद प्रसिद्ध करण्यांत येत आहे."

अनुवादकः—श्री. यशवंत धोंडो ओगले,
चेअरमन, पुणें सें. को. बँक लि.

चराचर विश्वच जेथें सहकारी तत्त्वावर मार्गक्रमण करीत आहे, तेथें त्या विश्वाचा एक घटक असलेला मनुष्यप्राणी त्या तत्त्वाला अपवाद कसा होऊं शकेल? उदाहरणच द्यावयाचें तर प्राणवायु व त्याच्या उत्पत्तीकृतीचें देतां येईल आणि याच प्राणवायूवर सृष्टींतील अखिल प्राणिमात्र व वनस्पतीसुद्धां अवलंबून नाहींत काय ? मानवाच्या शरीरांतील एकंदर परस्परावलंबी रचनाच त्याच्या सुदृढ प्रकृतीस कारण होत नाहीं काय ? या परस्परावलंबित्वांत जर यत्किंचितही संघर्ष उत्पन्न होऊं लागला तर मनुष्याचे प्रकृतींत तात्काल विकृति उत्पन्न होते, हें आपण पहातोंच ना? एकमेकावर अवलंबून असणें हें तर मानवी जीवनांतील आदितत्त्व आहे आणि पूर्वी मनुष्याकडून जीं कांहीं प्रचंड अशीं कार्यें झालीं तीं सर्व या सहकारी तत्त्वाचींच विजयचिन्हें होत.

त्यानंतरचे काळांत असंघटित असें कांहीं थोड्या प्रमाणांत सहकार्य चालू होतेंच. परंतु हल्लीं आपण ज्या सहकारी चळवळीबाबत बोलतों ती चळवळ सन १८४४ सालीं इंग्लंडमधील रॉकडेल गांवाच्या चौदा विणकारांनीं सुरू केली. ते विणकर लोक गरीब होते. परंतु त्यांच्या अंतःकरणांत सहकाराची ज्योत निर्माण होऊन त्यांनीं एकत्रित उत्पादन, मालाचा उठाव, शिक्षण व कारभार करण्याचें ठरविलें. एक सहकारी दुकान चालविण्यासाठी त्यांनीं प्रत्येकीं तीस रुपये भांडवल घालून एकूण चारशें वीस रुपयांचें भांडवल गोळा केलें. या लहानशा मुळापासून पुढील काळांत सहकार्याचा प्रचंड वृक्ष निर्माण झाला. अर्थात् सहकार्यांत लोकमतानुवर्ती कारभाराची उभारणी विशाल व कणखर तत्त्वावर केली हेंच त्याचें कारण होय. प्रथमपासूनच त्यांनीं प्रत्येक सभासदास एकच मत द्यावयाचें ठरविलें. मग तो सभासद पुरुष असो वा स्त्री असो, अगर कोणत्याहि वंशाचा, धर्माचा वा राजकीय मतांचा असो. रॉकडेलचे हे सहकाराचे प्रवर्तक ठोक भावानें माल खरेदी करीत व तो माल किरकोळीचे चालू बाजारभावानें आपल्या सभासदांना व इतर जनतेसही विकत देत. फक्त त्या व्यवहारांत त्यांनीं एकच गोम ठेविली होती आणि ती म्हणजे ज्या प्रमाणांत सभासद माल घेतील त्या प्रमाणांत त्यांना मालाचे किंमतींत सूट दिली जात असे. सभासद नसलेल्या गिऱ्हाइकास ही सूट मिळत नसे. फक्त इंग्लंडचेंच उदाहरण घेतलें तर अशी सूट मिळण्यास पात्र झालेली सभासद-संख्या आतां दश लक्षांनीं मोजावी लागेल. सहकारी तत्त्वावर चाललेल्या क्रय-विक्रय पद्धतींत मध्यस्थाची दलाली बहुतेक नामशेष होते व त्यामुळें जी बचत होते त्याचा फायदा साहजिकच गिऱ्हाईक सहकारी सभासदांना होतो.

वर सांगितलेलीं सहकाराचीं तत्त्वें दुसऱ्या अनेक व्यवहारांतही फायदेशीर होतात असें स्पष्टपणें दिसून आलें. त्यानंतर इटली व जर्मनीमध्यें सहकारी पतपेढ्या स्थापन होऊं लागल्या. आपल्या देशांतही सन १९०४ चे सुमारास याच प्रकारच्या पतपेढ्या खेड्यांत स्थापन करून त्या चालविण्याचा प्रयत्न त्यावेळचे सरकारकडून होऊं लागला. कारण आपल्या देशांत शेतकरी लोकांना कमी व्याजानें कर्ज कसें उपलब्ध करून द्यावें हा प्रश्न सोडविण्यासाठी या सहकारी चळवळींची कांस धरण्यांत आली. आतां तर आपल्या देशांत सहकारी पतपेढीशिवाय अनेक व्यवसायांत (उदाहरणार्थ सहकारी खरेदीविक्री संघ, सहकारी गृह बांधणी संस्था, सहकारी शेती, सहकारी पाटबंधाऱ्याच्या योजना, सहकारी लवाद, सहकारी विमाकंपन्या वगैरे) सहकाराचे तत्त्वांचा उपयोग उत्तम प्रकारें केला जात आहे. जें व्यक्तीला करणें तिच्या शक्तीबाहेरचें असतें तें समष्टि सहज करूं शकतें.

जनतेचे अत्यंत गुंतागुंतीचे असे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी पतपेढीसारख्या एकाच योजनेवर आजपर्यंत सर्व भर देण्यांत आल्यामुळें आपल्या देशांतील सहकारी चळवळीचे उत्कर्षांत बरेंच मोठें वैगुण्य आलें आहे हें मान्य करणें भाग आहे. कारण निर्धन शेतकरी व कामकरी यांची कमी व्याजानें कर्ज मिळणें एवढी एकच नड आहे असें नाहीं. त्यांच्या उद्योगधंद्यासाठी लागणारीं साधनें, त्यांच्याकडून उत्पादन होणाऱ्या मालाचा उठाव करणें, त्यांच्या शेतींत व शेतीच्या अवजारांत सुधारणा करणें, त्यांच्या शिक्षणाची सोय करणें, त्यांची रहाणी सुधारणें व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांची तरतूद करणें इत्यादि गोष्टी घडवून आणण्यासाठी सहकारी चळवळीच्या मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. या सर्व बाबतींत कांहीं थोडी प्रगती दिसत असली तरी ज्या प्रमाणांत सहकारी पतपेढ्यांची संघटना व प्रसार झाला त्या प्रमाणांत वरील निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांची वाढ झालेली नसून अद्याप करावयाचें राहिलेलें असें फार मोठें कार्य आपल्यापुढें उभें आहे.

सन १९४५-४६ चे अखेरीस अखंड हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या शेंकडा २.५ प्रमाणांत लोक मूलभूत सहकारी संघटनेंत सामील झालेले होते. प्रत्येक सहकारी कुटुंबांत ५ माणसें असतात असें गृहीत धरलें तर हें प्रमाण शेंकडा १२.५ पडतें. यावरून युरोप व अमेरिकेच्या मानानें या देशांतील सहकारी चळवळ बरीच मागसलेली आहे आणि या परिस्थितीस एक अंशतः कारण म्हणजे ह्या खंडप्राय देशाची निर्धनता हें होय. नाहीं म्हणावयास सहकारी पतपेढ्यांची वाढ हाच काय तो थोडासा अपवाद म्हणून मानणें भाग आहे. मग त्यांपैकीं कांहीं पतपेढ्यांची फार निकृष्टावस्थाही झालेली असो.

अनेक परकीय देशांत सहकारी ग्राहक संघ अत्यंत यशस्वी झाले आहेत. परंतु कांहीं अपवाद सोडल्यास आपल्याकडे ग्राहक संघांची वाढ खुंटलेलीच दिसते. अर्थात् हें मान्य करणें भाग आहे कीं, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा शक्यतोंवर सहकारी ग्राहक संघांचे मार्फतच करण्याचें सरकारी धोरणामुळें या ग्राहकसंघांचे चळवळीस तूर्त तरी जोम आलेला आपण पाहात आहोंत. जीवनावश्यक वस्तूंवरील निर्बंध उठल्यास ही मारून मुटकून वाढविलेली ग्राहकसंघांचीं दुकानें टिकणें हें त्या त्या दुकानचे ग्राहकांचे सदिच्छेवर व त्यांच्या सहकाराच्या तत्त्वावरील श्रद्धेवरच केवळ अवलंबून आहे. इतर ठिकाणीं माल खरेदी करण्यांत थोडी कसर रहात असली तरीही आपल्या सहकारी ग्राहक संघाकडूनच आपला माल घेण्याची सभासदांची निष्ठा कायम राहणें हीच त्या संघाच्या उत्कर्षाची अत्यंत महत्त्वाची अट आहे.

सहकारी चळवळींत अंतर्भूत असे जरी मोठे गुण असले तरी त्या चळवळीसही कांहीं मर्यादा आहेच व त्यांत कांहीं धोकेही पण आहेत. सरकारी चळवळीचे कांहीं प्रकार जनतेच्या अत्यंत खालच्या थरापर्यंत पोंचूंच शकत नाहींत. सचोटी, निष्ठा, वाकबगारपणा तसेंच साधनसामुग्री यांची सहकार्यानें वाढ होऊं शकेल पण सुरुवातीपासूनच या सर्व गोष्टींचा त्यांत अंतर्भाव झाला असला पाहिजे. उदाहरणार्थ, अनिश्चित अशा हवामानावर अवलंबून असणाऱ्या आपल्या निर्धन देशांत व्यक्ति कितीही सचोटीची व लायख असली तरी तिचेजवळ साधनसामुग्री नसेल तर तिच्या पतीस निर्धोकपणाची मान्यता मिळत नाहीं आणि अनियमित जबाबदारीच्या अशा आपल्याकडील बहुतेक खेडूत पतपेढ्या तो धोका पत्करण्यास कांकूं करतात. तसेंच या देशांत जी सहकारी चळवळ जनतेकडूनच मुख्यत: सहज स्फूर्तीनें लोकशाही तत्त्वावर सुरू होणें अवश्य होतें तेथें ती मुळापासूनच जणूं काय जनतेवर दडपणानें लादली जाते व पुढेंही त्या चळवळीचें सरकारकडूनच संवर्धन होतें व सरकारच त्या चळवळीचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत ठेवूं पाहतें. आमच्या या देशांतिल बहुजन समाजाच्या दारिद्र्यामुळें व अज्ञानामुळें कदाचित् ही परिस्थिति कांहीं काळ आवश्यक होती असें गृहीत धरलें तरीही इतर देशांत वैयक्तिक सहकाऱ्यास या चळवळीमुळें जे कांहीं फायदे झाले आहेत ते आपल्या देशांतिल जनतेस मिळूं शकत नाहींत. कारण या चळवळीस अत्यंत आवश्यक असलेली स्वयंप्रेरणा व जबाबदारी यांची त्यांना जाणिव नसते.

यासाठी सहकारी पद्धतीचें शिक्षण जास्त प्रमाणांत घ्यावयास पाहिजे. उदाहरणार्थ, आजपर्यंतच्या अनुभवानें आपल्यास असें सिद्ध करून दिलें आहे कीं, तुमचे हेतू कितीही चांगले असले तरी केवळ त्याच जोरावर तुम्ही सहकारी पतपेढीचे व्यवहार उत्तम प्रकारें चालवूं शकणार नाहीं. श्रीभगवंतांनीं गीतेंत " योगः कर्मसु कौशलम् " असें सांगितलें आहे. तुमच्या पतपेढीचे सभासदही तुमच्याच प्रमाणें सचोटीचे, खबरदारी घेणारे व पतपेढीवर अवलंबून असणारे असले पाहिजेत. सहकारी संस्थेचे घटकानेंही आळस सोडून संस्थेच्या व्यवहारावर अत्यंत बारीकपणें लक्ष ठेवलें पाहिजे. कारण, आर्थिक परिस्थितीची सुधारणा हा कांहीं सहकाराचा एकच उद्देश नाहीं. व्यक्तीचा चारित्र्य-विकास होण्यासाठीं शिक्षण देणारी अशी ही सहकारी चळवळ असली पाहिजे. सहकाऱ्यानें नियमितपणा पाळला पाहिजे, बचत करावयास शिकलें पाहिजे, त्यानें उद्योगी असलें पाहिजे व सचोटीनें वागलें पाहिजे आणि आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्यास सदैव उद्युक्त असलें पाहिजे. परस्परांचे चांगल्या संबंधाची व हितापहिताची जाणीव असणें यावरच सहकार अवलंबून आहे. योजकता व आत्मविश्वास या तर सहकार्याच्या अंगभूत देणग्या आहेतच, परंतु परस्परावलंबित्वाची ठाम भावनाही त्यांतूनच उगम पावते व त्यामुळेंच मानवी बंधुता व तदंगभूत परकल्याणाची नैतिक जबाबदारी यांचीही जाणीव होण्याचा असा एक लांबचा मार्ग आपल्या दृष्टिपथांत येऊं लागतो.

कांहीं सन्माननीय अपवाद सोडले तर आपल्या देशांतील सहकारी चळवळीनें शैक्षणिक व सामाजिक अशीं कांहीं कार्यें करण्याची हेळसांड केली असा प्रवाद ऐकूं येतो. एका इंग्लंडचेंच उदाहरण घेतलें तर असें दिसून येतें कीं, या दोन प्रकारच्या कार्यासाठीं गेल्या पंचवीस वर्षांत त्या देशानें ५¼ दश लक्ष पौंड रकम खर्च केली. ३० दशलक्ष पौंड रकम मृत सभासदांच्या कुटुंबियांसाठी खर्च केली व २½ दशलक्ष पौंडांची रकम गोरगरिबांना दान देण्यासाठीं खर्च केली.

सहकारी चळवळींत अंतर्भूत असलेल्या आर्थिक बाबींच्या विकासास वाव आहे ही बरीच आशादायी गोष्ट होय. मागणीची वाढ झाली कीं ग्राहकांस तो माल स्वस्त भावांत देण्यास परवडतें. उत्पादनाचे मानानें तो माल तयार करण्यास उत्पादकालाही कमी खर्च येतो. पतपेढीवर अवलंबून असलेले जितके जास्त सभासद तितकी वैयक्तिक जबाबदारी कमी होत जाते. सहकारी ठोक संस्था, इलाख्याच्या बाजारी संस्था व जिल्ह्याच्या सहकारी बँका यामुळें बऱ्याच स्थानिक सहकारी गटांना बचत करण्याची हल्लीं संधि मिळते.

एका दृष्टीनें सहकार म्हणजे व्यक्तिगत लाभाची उच्चतम श्रेणी होय; अगर सर्वांस आवश्यक असलेल्या आर्थिक उन्नतीकडे लक्ष ठेवून परस्परांच्या आर्थिक गरजा दूर करण्यासाठी स्वयंस्फूर्तीनें एकत्रित झालेला व्यक्तिसमूह होय.

श्री. वैकुंठराय मेथा यांनीं एक ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं "नैतिक जबाबदारीच्या जाणीवेची क्रमश: वाढ व त्यासाठीं आवश्यक असलेले नैतिक प्रयत्न" जर सहकाऱ्यांचेकडून झाले नाहींत तर आतांच सांगितलेल्या सहकार्याच्या दिशा या आपलीं मुख्य उद्दिष्टें साध्य करूं शकलीं नाहींत, असें मान्य करणें भाग होईल.

सहकार्याचीं उद्दिष्टें ज्यांनीं मान्य केलीं आहेत त्यांच्याकडून सहकार्यासाठीं कितपत त्यागाची तयारी असूं शकते यावर सहकारी चळवळीचें संवर्धन अवलंबून असतें. आपल्या देशांतील आजपर्यंतची सहकारी चळवळ ( त्या चळवळींत जो कांहीं थोडा जोम दिसतो तो ) ही बहुंशीं आपल्या निर्धन व सामान्यत: अशिक्षित बांधवांचें कल्याण साधण्याचें एक उत्कृष्ट साधन असें मानून स्वत:च्या परिश्रमाकडे लक्ष न देतां स्वयंस्फूर्तीनें सहानुभूतिपूर्वक असे ज्यांनीं प्रयत्न केले त्यांच्यावरच अवलंबून होती.

सहकारी चळवळीच्या प्रसारकांनींच अनेक वेळां या चळवळीस अजाणतां गालबोट लावलें आहे, आणि तें असें कीं ते फक्त सहकाराचे फायदेच तेवढे नेमके सांगतात. परंतु सहकारी तत्त्वांचें काटेकोरपणानें पालन न केल्यामुळें त्या संस्थांच्या प्रगतिपथावर आडवे येणारे खांचखळगे पाहून बहुजन समाजाच्या उत्कर्षाचे ध्येयसाधनांत आपल्याकडून सहकाराच्या ध्येयाची विस्मृति होते कीं काय अशी फार भीति वाटूं लागते. सहकारी तत्त्वाच्या कल्पनेवर वेळेवर पाणी सोडूनही आपण ज्यावेळीं रुपये, आणे, पै यांच्या महत्त्वावरच वाजवीपेक्षां जास्त एकतानता करूं इच्छितों त्यावेळीं संबंधित सहकारी व्यक्तींचे बाबतींत आपण एक मोठीच संधि गमावतों हें विसरून चालणार नाहीं.

एकपक्षी निर्घृण असा भांडवलवाद व दुसरे पक्षी समाजसत्तावाद, एकपक्षी अनियंत्रित व्यक्तिमत्त्व व दुसरे पक्षी सर्व सत्ताधारी शासनसंस्था कीं ज्यामध्यें व्यक्तीला महत्त्वच नसून शासनसंस्था अनन्यसत्ता धारण करते ती, या परस्परांहून फार दूर असलेल्या दोन टोंकांमधील सुवर्णमध्य म्हणून जीवनतत्त्ववादाप्रमाणें सहकाराचें तत्त्व हें सहजगत्या दृष्टिपथांत येतें. दुर्दैवानें आपल्या देशांतील सहकारी चळवळ ही या दुसऱ्या टोकाकडे झुकते कीं काय अशी राहून राहून शंका वाटूं लागते. कारण, सर्वसाधारणरीत्या सामान्य जनतेची ग्रहणशक्ति सहन करूं शकेल त्यापेक्षा जास्त ताण या चळवळींतील अधिकारी वर्गाकडून घातला जातो जनतेची स्वयंस्फूर्तता हा सहकारी चळवळीचा निश्वास होय. परंतु ती स्वयंस्फूर्तता कमी करून जनतेवर एखाद्या विशिष्ट सहकारी पद्धतीचा बोजा लादण्याच्या प्रयत्नास — मग तो कितीही अधिकृत असो—अत्यंत धीटपणानें विरोधच करणें भाग आहे.

सहकारी चळवळीस "लोकशाहीची दुसरी संधि" असेंही संबोधलें जातें. त्यासाठी सहकारी संस्था चालविण्यास आवश्यक असलेल्या तंत्राचे शिक्षणापेक्षांही सहकार्याच्या मूलतत्त्वाचें शिक्षण घेणें हें जास्त महत्त्वाचें आहे. कारण संस्थेच्या प्रत्यक्ष व्यवहाराच्या उठावदारपणापेक्षांही अखिल जनतेला सहकारी तत्वाचें शिक्षण देऊन शहाणे करणें हें अधिक महत्वाचें आहे. जर सहकार हें जगांतील एक अत्यंत अवघड परंतु सुंदर शास्त्र असेल तर त्याचा मनुष्यमात्रास अत्यंत उपयोग झालाच पाहिजे. मात्र व्यक्तिचारित्र्याचा विकास व समाजधारणेचा एक उपक्रम करण्याची संधि बाजूस सारून संस्थेच्या व्यवहारांत होणाऱ्या फायद्याकडेच केवळ लक्ष देण्याची प्रथा अगदी त्याज्य समजली पाहिजे.

लोकशाहीची शक्ति तिच्या घटकांत असते आणि घटकाची शक्ति त्याच्या सदसद्विवेकबुद्धींत असते.

## ठेवी कमी झाल्या, कर्जें वाढलीं, रोकडीचें प्रमाण उतरलें.

शेड्यूल्ड बँकांसंबंधीं तुलनात्मक आकडे

( आकडे कोटी रुपयांचे )

| | ३१-१२-४८ | २५-३-४९ |
|---|---|---|
| हिंदुस्थानांतील एकूण देणीं | ९६३·१५ | ९१५·८६ |
| बिगर-मुदतीचीं (डिमांड) देणीं | ६६०·२४ | ६३०·५८ |
| रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेल्या ठेवी व बँकांतील रोख रक्कम | १०७·३३ | ८९·७४ |
| त्यांचें एकूण देण्यांशीं प्रमाण | ११·१४% | ९·७९% |
| कर्जें | ४४२·०९ | ४९६·४६ |
| त्यांचें एकूण देण्यांशीं प्रमाण | ४५·९०% | ५२·२१% |
| कायद्यानें आवश्यक असल्यापेक्षा रिझर्व्ह बँकेकडे अधिक ठेवलेली रक्कम | २८·०३ | १७·२४ |

### दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार प्रीमियर को. हौसिंग सोसायटी लि.; नागपूर

ही संस्था १९३० सालीं श्री. गो. आ. भोंसुले ह्यांनीं स्थापन केली. तिनें उत्कृष्ट प्रगति केली असून ती सतत "अ" वर्गांत आहे. १९३०-३१ मध्यें सोसायटीचे १२ सभासद होते. वसूल भांडवल १,४०० रु. होतें, तिचेकडे २,४०० रुपयांच्या ठेवी होत्या व ३,६०० रु. तिचेकडे सभासदांचें येणें होतें. आतां सभासदांची संख्या १,३६३ झाली असून वसूल भांडवलाचा आकडा ४,५९, ४०० रु. झाला आहे. ठेवींची रक्कम ८,२७,००० रुपयांवर जाऊन गंगाजळींत ५०,३२० रुपये सांठले आहेत. सभासदांकडून येणें कर्ज ११,०७,२०० रु. आहे. ह्या कर्जाबद्दल संस्थेजवळ युद्धपूर्व किंमतीची ४० लक्ष रुपये किंमतीचीं घरें व जागा मिळून इस्टेट तावेगहाण आहे. सर्व घरांचा आगीचा विमा त्यांच्या पूर्ण किंमतीचा उतरलेला आहे. प्रत्येक कर्जदार सभासदाकडून इतर दोन सभासदांच्या जमानती घेतलेल्या आहेत. कांहीं सभासदांकडून विमा पॉलिसी बेची करून घेतलेल्या आहेत. कर्जाचे रकमेपैकी बुडीत अशी मुळीच रक्कम नाहीं.

३० जून, १९४८ अखेर संपलेल्या वर्षी सोसायटीनें ४,२०,२२२ रु. कर्ज दिलें व २,१३,२४१ रु. एकूण कर्जापैकी वसूल झाले. २६,८४१ रु. नफा झाला, त्यांतून ७,२९० रु. राखीव व इतर निधींत टाकून ४½% दरानें डिव्हिडंड वाटण्याकडे १९,४०० रुपयांचा विनियोग करण्यांत आला.

वरील वृत्तांतावरून, मध्यप्रांत-वऱ्हाडांतील हौसिंग सोसायट्यांमधील ह्या अग्रेसर संस्थेच्या कार्याची कल्पना येईल. श्री. गो. आ. भोंसुले हे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष असून श्री. श्री. रा. मंगरूळकर हे उपाध्यक्ष आहेत. श्री. ह. स. कोलते व श्री. कृ. भा. फडणवीस हे दोघे कार्यकारी मंडळाचे सदस्य ऑनररी सेक्रेटरी आहेत.

### महाराष्ट्र व्यापारी परिषद्‌—अधिवेशन ७ वें.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई, या संस्थेच्या आधिपत्याखालीं महाराष्ट्र व्यापारी परिषदेचें ७ वें अधिवेशन नाशिक येथें शनिवार व रविवार ता. २८ व ता. २९ मे रोजीं भरण्याचें निश्चित झालें आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान राजाबहादूर गोविंदलाल शिवलाल मोतीलाल यांनीं स्वीकारण्याचें मान्य केलें आहे.


## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )

स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| मागांचें भांडवल | रु. २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५१ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## बँक ऑफ पूना लि.

— शेड्यूल्ड बँक —

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | २५,००,००० |
| वसूल भांडवल | १२,५०,००० |

संचालक मंडळ

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया—चेअरमन, २ शेठ डी. आर. नाईक, जे. पी. ( व्हा. चेअरमन ), ३ डॉ. ना. भि. परुळेकर, एम. ए., पीएच. डी., संचालक—सकाळ, ४ शेठ फ्रामजी पी. पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी ( सोलापूर ), ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, ७ शेठ गणपतराव काळूराम नाईक, बी. एससी., बी.ई., एलएल. बी.

मुख्य ऑफिस—४५५, रविवार, पुणें

शाखाः—( १ ) भवानी पेठ, ( २ ) सदाशिव पेठ, पुणें २, ( ३ ) सोलापूर, ( ४ ) सांगली.

हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांवर ड्राफ्टस् व हुंड्या दिल्या जातात.

आपल्याजवळच्या पैशाचा योग्य मोबदला या बँकेच्या निरनिराळ्या योजनेनें घ्या. सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.

विशेष माहितीकरितां लिहा—

गो. ग. साठे, ए. बी. आय. (लंडन), मॅनेजर

## सहकारी जिल्हा बँकांतील पगाराचें प्रमाण

( लेखकः—श्री. ल. का. कुलकर्णी, अहमदनगर )

हल्लींच्या महागाईच्या काळांत जास्त कुचंबणा कोणाची होत असेल तर खाजगी संस्थेंत काम करणाऱ्या नोकरांची! त्यांना मिळणारा पगार फार अपुरा पडतो. जिल्हा बँकांच्या पगाराचें प्रमाण गव्हर्मेंट स्केलपेक्षां फार कमी आहे. बँकेंत काम करणाऱ्या नोकरावर उपासमारीची पाळी येते. इंपिरियल व रिझर्व्ह बँकेच्या नोकरांना सरकारी नियमाप्रमाणें पगार मिळतो. पण जिल्हा बँकांना तसेंच सहकारी ( को–ऑपरेटिव्ह ) बँकांना हें प्रमाण लागूं पडत नाहीं. त्यामुळें इंपिरियल बँकेच्या शिपायाचा पगार व इतर बँकेच्या कारकुनाचा पगार सारखा झालेला आहे. सरकारी नोकरांना सुरवातीला ५५ + ४५ असे १०० रुपये मिळतात तर बँकेच्या नोकरांना सुरवातीला ३५ + ४० असे ७५ रुपये मिळतात. म्हणजे २५–३० रुपये तफावत आहे. त्यामुळें सहाजीकच बँकेंत नोकरी करतां अर्ज येतात ते केवळ निवाऱ्याची जागा म्हणून. इतरत्र चांगली जागा मिळविण्यासाठी पायरी या दृष्टीनें बँकेचा उपयोग व्हायला लागला आहे. मॅट्रिकनंतर सरकारी नोकरी मिळेपर्यंत बँकेसारख्या संस्थेंत कमी पगारावर नोकरी करण्यास गरजू उमेदवार तयार होतात. यामुळें बँकेच्या कामावर परिमाण होतो. अनुभवी नोकरवर्ग टिकून रहात नाहीं. नोकरांची कार्यक्षमता वाढत नाहीं.

पगार पुरत नसला तरी दडपशाहीमुळें व नोकरीची गरज असल्यामुळें नोकरांच्या तोंडून अन्यायाविरुद्ध ओरड केली जात नाहीं. कांहीं वेळां त्यांच्या मागण्यांचा विचार केला जात नाहीं. कांहीं वेळां मागण्या धुडकावून लावल्या जातात तर कांहीं वेळां त्यांना खुष करण्यासाठी दोन रुपये–तीन रुपये पगारवाढ केली जाते. जिल्हा बँकांच्या पगाराचें प्रमाण बदललें पाहिजे. मुंबई प्रांतांतील जिल्हा बँकांचें पगाराचें प्रमाण कमी-अधिक प्रमाणांत आहे पण या बँकेंतलि कुठल्याहि नोकराला ( ऑफीसर्स वगळून ) सरकारी पगाराप्रमाणें पगार मिळत नाहीं.

जिल्हा बँकांच्या कारभाराची किल्ली बँकेचा चेअरमन व मॅनेजर यांच्या हातीं असते. त्यांच्या सल्ल्याप्रमाणें डायरेक्टर बोर्ड कारभार चालवीत असतें. तेव्हां बँकेच्या कारभारांत वशिलेबाजी व हुकूमशाही यांना बरेंच प्राधान्य असतें. नोकरांच्या हितापेक्षा बँकेच्या हिताकडे त्यांचें लक्ष जास्त वेधलेलें असतें. जिल्हा बँकांच्या पगाराचें चालू प्रमाण बदललें गेलेंच पाहिजे सरकारनें अथवा रजिस्ट्रार, को–ऑपरेटिव्ह सोसायटीज यांनीं मुंबई प्रांतांतील जिल्हा बँकांचे तसेच इतर सहकारी बँकांचे पगाराचे आंकडे मागवून त्यांची तुलना इंपिरियल व रिझर्व्ह बँकेच्या पगाराशीं करावी. जिल्हा बँकांचें क्षेत्र मर्यादित असलें व इंपिरियल बँकेप्रमाणें पगार देता जरी आला नाहीं तरी चालू परिस्थितींत निश्चित सुधारणा घडवून आणतां येईल.

मुंबई प्रांतांतील सर्व बँकांच्या पगाराचे आंकडे मागवून जिल्हा सहकारी बँकेच्या नोकरांचा किमान पगार, पगार वाढ, महागाई, याविषयीं सरकारी धोरण जाहीर होणें अत्यावश्यक झालें आहे. महाराष्ट्रांतील बँकांचें, बँकांमध्यें काम करीत असलेल्या नोकरांचें, तसेंच रजिस्ट्रार साहेब यांचें लक्ष मी माझ्या या विनंतीकडे वेधूं इच्छितों.


**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

स्थापना–१९१७

फोन नं. १४८३ | तारेचा पत्ता “ Cencobank ” | पोस्टबॉक्स नं. ५११

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



**दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,०९,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, यां कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## परदेशांतील बातम्या

**अमेरिकेची परदेशांतील मालमत्ता**—युद्धाच्या अखेर अमेरिकेची परदेशांत बरीच मालमत्ता होती. त्यापैकीं ९९ टक्के मालमत्ता अमेरिकेनें एका डॉलरच्या मालाला फक्त १९ सेंट घेऊन विकून टाकली आहे. ह्या मालमत्तेची किंमत ९,२३,६०,००,००० डॉलर्स होती. मालमत्तेपैकीं ६२ टक्के मालमत्ता परकीय सरकारांना घाऊक रीतीनें विकण्यांत आली. फ्रान्सनें मूळची १,४०,००,००,००० डॉलर्सची मालमत्ता ३०,००,००,००० डॉलर्संना विकत घेतली. त्यानंतर फिलिपाइन्स बेटांचा व चीनचा अनुक्रम लागतो. चीनच्या सरकारनें ८२,४०,०००,००० डॉलर्स किंमतीचें युद्धसाहित्य १७,००,००,००० डॉलर्स देऊन विकत घेतलें.

**पाकिस्तानचें नवीन भांडवलावर नियंत्रण**—पाकिस्तान सरकारनें नवीन भांडवलावर अधिक नियंत्रणें घातलीं आहेत. ह्यापूर्वीं पाकिस्तानांत बँका, विमा कंपन्या आणि प्रॉव्हिडंट कंपन्या सोडून इतर कंपन्यांना सरकारी परवानगीशिवाय १२ महिन्यांत १ लाख रुपयांचें भांडवल उभारण्याची परवानगी होती. आतां कोणत्याही कंपनीला असें भांडवल उभारता येणार नाहीं. ह्या नियंत्रणामुळें कंपन्यांना आपलें विक्रीला वाढलेलें भांडवल १ लाख रुपयापेक्षा अधिक वाढविण्याचें झाल्यास सरकारची आगाऊ मंजुरी घ्यावी लागेल.

**इंग्लंडमधील कापड नियंत्रण उठलें**— इंग्लंडमध्यें कापडाच्या व सुताच्या किंमतीवर घालण्यांत आलेलीं बहुतेक नियंत्रणें आतां रद्द करण्यांत आलीं आहेत. इंग्लंडमधील कापड गिरण्यांनीं जाहिरातीं पण अधिक उपयुक्त कापड निर्माण करावें, असा नियंत्रणें रद्द करण्याचा हेतु आहे.

**पाकिस्तानमधील गव्हाची लागवड**—१९४८-४९ मधील पाकिस्तानांतील गव्हाच्या लागवडीसाठीं असणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रफळाचा अंदाज १,०३,१३,००० एकर इतका करण्यांत आला आहे. गेल्या वर्षीं हा अंदाज ९५,५०,००० एकर इतका होता. पाकिस्तानांत एकंदरीनें गव्हाखालील जमिनींत ८ टक्के वाढ झाली असल्याचें सरकारी पत्रकांत नमूद करण्यांत आलें आहे. फक्त बलुचिस्तानांत मात्र ७·९ टक्के घट झाली आहे.

**दुर्मिळ पोस्टाच्या तिकिटांचा लिलांव**—मुंबईचे एक दिवंगत नागरिक श्री. सी. डी. देसाई ह्यांच्या जवळ अत्यंत दुर्मिळ अशा पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह होता. ह्या संग्रहाची किंमत सुमारें २,६६,००० रुपये असून त्याचा लिलांव लवकरच लंडन येथें होणार आहे. संग्रहांत हिंदुस्थानांतील १८५४ सालामधील अर्धा आणा, एक आणा, दोन आणे आणि चार आणे किंमतीचीं तिकिटें आहेत. तिकिटें छापण्यांत झालेली चूक दाखविणारीं दोन तिकिटें संग्रहांत आहेत. ह्या तिकिटांवर व्हिक्टोरिआ राणीचा फोटो उलटा छापलेला आहे. ह्या एकेका तिकिटाची किंमतच सुमारें १३,३३३ रुपये येईल, असा अंदाज आहे.

**अणुबाँबच्या निर्मितीसाठीं प्रयत्न**—रशिआनें अणुबाँबच्या निर्मितीसाठीं कसून प्रयत्न चालविले असून ह्या खास कामगिरीवर माजी परराष्ट्रमंत्री एम्. मोलोटाव्ह ह्यांची नेमणूक झाल्याची वार्ता आहे. उरल पर्वताच्या पूर्वेस ह्या कार्यासाठीं एक शहरच उभारण्यांत आलें असून त्याच्या आसपासचा ५० मैलांचा प्रदेश संरक्षित म्हणून ठरविण्यांत आला आहे. ह्या शहरांत ५०,००० कामगार काम करीत आहेत, असें म्हणतात.

**शेक्सपिअरचा स्मृतिदिन**—जगप्रसिद्ध आंग्ल नाटककार विल्यम शेक्सपिअर ह्याचा ३८५ वा वाढदिवस स्ट्रॅटफर्ड-ऑन-ॲव्हन ह्या त्याच्या जन्माच्या गांवीं साजरा झाला. ह्या प्रसंगीं ३० राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं गांवांतील मुलांच्यासह मिरवणूक काढली होती. त्यानंतर ह्या सर्व प्रतिनिधींनीं आपआपल्या राष्ट्रांच्या निशाणांना वंदन केलें.

**ब्रिटननें गॅसच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण केलें**—ब्रिटननें देशांतील गॅस पुरविणाऱ्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण केलें आहे. ह्यापुढें हा धंदा नॅशनल गॅस कौन्सिल ही सरकारी संस्था चालविणार आहे. ह्या कौन्सिलवर ब्रिटनमधील १२ विभागीय बोर्डांचे अध्यक्षही घेण्यांत आले आहेत. गॅस कंपन्यांच्या भागीदारांना सरकारनें नुकसानभरपाई म्हणून राष्ट्रीय मालकीच्या ह्या धंद्यांत सरकारी भाग दिले आहेत. नुकसानभरपाई देण्याचें हें धोरण इतर धंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाच्या वेळींही ब्रिटिश सरकारनें पाळलें आहे.

**पश्चिम युरोपमधील रोजगार वाढला**—मार्शल योजनेप्रमाणें मदत घेणाऱ्या पश्चिम युरोपांतील राष्ट्रांत युद्धापूर्वीपेक्षा रोजगारी वाढली आहे. १९३७ सालापेक्षा आज बिगर शेतकीविषयक रोजगारांत अधिक लोक गुंतलेले आहेत. रोजगारी वाढल्यामुळें सामान्य कामगाराला १० वर्षांपूर्वी जितकें खाद्यपेय मिळत होतें तितकें आतां सरासरीनें मिळूं लागलें आहे. जर्मनी, ग्रीस, इटली आणि बेल्जम ह्या देशांतून मात्र परिस्थिति फारशी सुधारलेली नाहीं.


**बांठीया बँक लिमिटेड**

पनवेल ( कुलाबा )

स्थापना १९४३

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४१,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

मुंबईः—६५-६७ झव्हेरी बझार. बेलापूररोडः—पोस्टासमोर
पुणेंः—१२६८ भवानी पेठ. कल्याणः—शिवाजी चौक
अहमदनगरः—बझार पेठ. भिवंडीः—बझार पेठ
चेअरमनः—श्री. रतनचंद भिकमदास बांठीया
मॅनेजिंग डिरेक्टरः—श्री. बिरदीचंद भूरचंद बांठीया.

डायरेक्टर्सः—श्री. केशरचंद आनंदराम बांठीया, श्री. गंगाधर विष्णू पुराणिक, श्री. शिवराज आनंदराम बांठीया, श्री. रावजी भिमजी रंगपरीया. ( ऑ. मॅजिस्ट्रेट ), श्री. केशव गोविंद लिमये, बी. ए., एलएल. बी., श्री. जे. एस्. कासट, बी. कॉम., श्री. चुनिलाल जसरुप मुनोथ., श्री. सोराबजी रुस्तोमजी घासवाला.

जनरल मॅनेजरः—श्री. गणेश भैरव साठे.

*बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

आर. पी. जोशी, B. A., Cert. A. I. I. B.
मॅनेजर.



खून साफ करनेमें मशहूर डॉ. वामन गोपाल का सारसापरिला

## रहाणीच्या खर्चांत वाढ

### कानपूर, मुंबई, मद्रास

१९३९ सालीं रहाणीचा खर्च १०० होता असें मानलें, तर कानपूर शहरांत तो फेब्रुवारी १९४९ मध्यें ५१५ झाला. कानपूर शहराचा महागाईचे दृष्टीनें पहिला अनुक्रम लागतो. मार्च महिन्यांत मात्र तेथील खर्चाचा आकडा ४७९ वर आला. मुंबई (२९२) व मद्रास (३३१) येथील महागाई त्यामानानें कांहींच नाहीं! दिल्ली व कलकत्ता येथील महागाई सुप्रसिद्ध आहे. परंतु त्याबाबत ताजे आकडे मिळालेले नाहींत. नागपूरमधील रहाणीचा खर्च डिसेंबर १९४८ मध्यें ३८९ होता.

### अमेरिका, कॅनडा, ग्रेट ब्रिटन

हिंदुस्थानांत इतकी महागाई झाली, तरी अमेरिकेंत ती १७७ चेवर कधींच गेली नाहीं. डिसेंबर १९४८ अखेरच्या रहाणीच्या खर्चाचें मान १७३ च होतें. कॅनडांतहि तें १५६ चे वर गेलें नाहीं आणि ग्रेट ब्रिटनमध्यें तें ११० ते ११३ ह्या दरम्यान होतें.

### फ्रान्स

फ्रान्समध्यें रहाणीचा खर्च १९३९ मध्यें १०० होता असें गृहीत धरलें, तर तो डिसेंबर १९४८ मध्यें १,८७५ झालेला होता. ह्यावरून तेथील परिस्थितीची कल्पना येईल.

### चीन

सयाममधील रहाणीच्या खर्चाचें मान १९४७ सालीं १२७२ झालें होतें. इजिप्तमध्यें सप्टेंबर १९४८ मध्यें तें २७५ होतें. बर्मामध्यें तें नोव्हेंबर १९४८ मध्यें ३७८ होतें. चीनबद्दल बोलायलाच नको. १९३९ सालीं तेथील रहाणीचा खर्च १०० होता असें धरलें तर ऑगस्ट १९४८ मध्यें तो १८,४३,९१,००० झाला! त्या नंतरचा आकडा अधिकच मोठा असणार!

---

## आयात कमी करण्यासाठी उपाययोजना

### ११ वा ओपन जनरल लायसेन्स तहकूब

गेल्या कांहीं महिन्यांत हिंदुस्थानामध्यें फार मोठ्या प्रमाणावर मालाची आयात झाली आहे. अन्नधान्याची आयात तर चालूच आहे. त्यामुळें, आयात-निर्गतविषयक ताळेबंदांतील तूट वाढत चालली आहे. त्यामुळें आयातीवर निर्बंध घालणें सरकारास जरूर पडून, त्यानें ओपन जनरल लायसेन्स नं. ११ हा तहकूब ठेवला आहे. व्यापाऱ्यांनीं मालाच्या खरेदीबद्दल परदेशीय व्यापाऱ्यांशीं करार करूं नयेत; कारण तें पाळले जाण्यासाठी आयातीस परवाने मिळणार नाहींत, असें सरकारनें जाहीर केलें आहे. ११ व्या लायसेन्समधील यादीची तपासणी चालू आहे.

---

### दरताशीं १,००० बिड्या करणारें यंत्र

नाशिकचे श्री. क्षीरसागर ह्यांनीं एक यंत्र बनविलें आहे, तें दरताशीं १,००० बिड्या करूं शकतें. ह्या पायमशिनचा आकार ३×३ फूट असून त्यांत एकूण ७०० भाग आहेत. पायाऐवजी पॉवरनेंहि मशीन चालवितां येईल. सध्या हातानें वळण्यांत येणारी बिडी व यंत्रावर केलेली बिडी ही इतकी सारखी दिसतील, कीं त्यांतील फरक ओळखता येणार नाहीं. न्यू इंडियन मशीन वर्क्स लि. पंचवटी, नाशिक, येथें हें मशिन पहावयास मिळेल.

बेडेकर पापड

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

कूळ व शेत-जमीन कायदा
१९४८
प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु.; उत्तम कागद व बांधणी ५ रु; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. २ रु.; दोन्ही कूळ कायदा सवलतीची किंमत साधी बांधणी ५ रु. व मजबूत बांधणी ६ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.
नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.
पत्ता— लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.
कोपरगांव, जि. अहमदनगर.
( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )
कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.
स्थानिक सहकारी बँक
सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.
बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.
आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेंपर्यंत स्वीकारल्या जातील.
सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.
विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.
जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.